# गीतामृताचा प्रवाह

## रामकृष्ण महाराज आणि वारकरी संप्रदाय



संपादक
प्रा.डॉ.रामकृष्ण बदने

कार्यकारी संपादक
ह.भ.प.तुकाराम शास्त्री मुंडे महाराज
भानुदास (भाऊराजे) बाबुराव केंद्रे

# गीतामृताचा प्रवाह : रामकृष्ण महाराज आणि वारकरी संप्रदाय

© प्रा.डॉ. रामकृष्ण बदने
ह.भ.प.तुकाराम महाराज मुंडे शास्त्री
भानुदास(भाऊराजे) बाबुराव केंद्रे

❖ **Publisher :**
**Harshwardhan Publication Pvt.Ltd.**
Limbaganesh, Dist. Beed (Maharashtra)
Pin-431126, vidyawarta@gmail.com
9850203295

❖ **Printed by :**
Harshwardhan Publication Pvt.Ltd.
Limbaganesh, Dist. Beed, Pin-431126
**www.vidyawarta.com**
7588057695

❖ **Page design & Cover :**
H.P. Office (Source by Google)

❖ **Edition: April 2022**

**ISBN 978-93-92584-95-4**

❖ **Price : 299 / -**

www. विद्यावार्ता® .कॉम
YouTube Channel

All Rights Reserved, No part of this publication may be reproduced, or transmitted, in any form or by any means, electronic mechanical, recording, scanning or otherwise, without the prior written permission of the copyright owner. Responsibility for the facts stated, opinions expressed. Conclusions reached and plagiarism, If any, In this volume is entirely that of the Author. The Publisher bears no responsibility for them. What so ever.Disputes, If any shall be decided by the court at Beed (Maharashtra, India)

# || अनुक्रमणिका ||

❖ शुभेच्छा संदेश...
❖ संपादकीय...
❖ दुर्मिळ छायाचित्रे...

भाग– ०१

❖ वै.रामकृष्ण महाराज जीवन व कार्य तथा गीताभवन

०१) 'सुवर्ण महोत्सवी' सुवर्णमयी वाटचाल
ज्ञानोबा माऊली लटपटे कोद्रीकर ||19

०२) वै.ह.भ.प.रामकृष्ण महाराज केंद्रे वंशवेल
बाबुराव भानुदासराव केंद्रे, आळंदी (दे.) ||24

०३) राष्ट्रसंत भगवान बाबा यांचे आचारशील वारसदार – ...
श्री ह.भ.प. तुकाराम महाराज मुंडे शास्त्री, टोकवाडी ||26

०४) देगलूरकर संत परंपरेशी रामकृष्ण महाराजांचा अनुबंध
शरदचंद्र एकनाथमहाराज देगलूरकर ||29

०५) गीताभवनचे दिपस्तंभ वै.रामकृष्ण महाराज
प्रकाश नरहरीराव घुले, लातूर ||32

०६) वै.रामकृष्ण महाराजांच्या विचारांना वाहिलेली रामकृष्ण महाराज केंद्रे शिक्षण संस्था
प्रा.डॉ. देविदास केंद्रे, नांदेड ||36

०७) विचार रामकृष्ण महाराजांचे
प्रा.डॉ. रामकृष्ण बदने, नांदेड ||40

०८) गीता भवन ट्रस्टच्या भविष्यकालीन योजना
भानुदास(भाऊराजे) बाबुराव केंद्रे, नांदेड ||44

०९) वारकरी संप्रदायातील तत्त्वनिष्ठ व्यक्तिमत्त्व वै.ह.भ.प रामकृष्ण महाराज केंद्रे
रामकृष्ण (कृष्णा) बाबूराव केंद्रे, नांदेड ||47

# || अनुक्रमणिका ||

भाग --०२

## ❖ वारकरी संप्रदाय : विविध आयाम


०१) वारकरी संप्रदाय: विचार, लक्षणे आणि आचरणप्रधानता
प्रा.डॉ.विठ्ठल खंडूजी जायभाये, परभणी ||51

०२) वारकरी संप्रदायाचे तत्त्वज्ञान
डॉ.नवनाथ रासकर, फलटण ||59

०३) श्रीमद्भगवद्गीता आणि प्रस्थानत्रयी
डॉ.पुरुषोत्तम शेषराव जुन्ने, जालना ||65

०४) जगायला शिकवणारी पंढरीची वारी,ऊर्जादायी आकर्षणे, मुल्य ...
उध्दव(वापू) फड, लातूर ||70

०५) वारकरी संप्रदायाची सर्वसमावेशक साधना अखंड हरिनाम ...
श्री. ह.भ.प. प्रा.डॉ.रामायणाचार्य नाना महाराज कदम ||78

०६) वारकरी संप्रदाय कीर्तन परंपरा
प्रा. विद्या खाडे (दळवे), बीड ||80

०७) वारकरी संगीत परंपरा -- प्राचीन आणि अर्वाचीन
पं. यादवराज फड, पुणे ||83

०८) लोकगीतातून येणारे पंढरपूर महात्म्य
प्रा.डॉ. पंडित आनंदराव शिंदे, नांदेड ||85

०९) संतसाहित्य वर्णित वारकरी संप्रदाय व तीर्थक्षेत्र 'पंढरी' महात्म्य
प्रा.डॉ.अनिल व्यंकटराव मुंढे, लातूर ||89

१०) आळंदी हे गाव । पुण्यभूमी ठाव।।
प्रा.अविनाश खोखले, लातूर ||94

११) वारकरी संप्रदायात स्त्रीचे स्थान माऊलीमय
डॉ. विजयकुमार पं. फड, औरंगाबाद ||104

२२) समाजसुधारणेतील स्त्रीसंतांचे योगदान
प्रा. ज्ञानेश्वर भोसले, पालघर ||109

२३) वारकरी संप्रदायातील पुरुष संतांचे योगदान
प्रा. बरसमवाड विठ्ठल गणपतराव, अहमदनगर ||117

२४) वारकरी संप्रदायात ज्ञानेश्वरी व भावार्थ रामायणाचे महत्त्व
प्रा.योगीराज बदने, परभणी ||127

२५) वारकरी संप्रदायातील 'वर्णित'' 'गुरु महात्म्य'
माणिक मुंडे,कोद्रीकर, परभणी ||132

२६) वारकरी संप्रदायात वर्णित नाम महात्म्य
प्राचार्य डॉ.दीनानाथ फुलवाडकर, परभणी ||137

❖ गीताभवन ट्रस्टचे छायाचित्र...

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
विद्यावार्ता
International Multilingual Research Journal
9850203295

Visit our Website > www.vidyawarta.com

# ०७ विचार रामकृष्ण महाराजांचे

प्रा.डॉ. रामकृष्ण बदने
ता.मुखेड जि. नांदेड

गुरुवर्य वै.ह.भ.प. रामकृष्ण महाराज केंद्रे म्हणजे विसाव्या शतकातील महान विभूती होत.

'नाचू कीर्तनाचे रंगी ।
ज्ञानदीप लावू जगी ।।'

या संत नामदेव महाराजांच्या उक्तीप्रमाणे महाराजांनी कीर्तनाच्या माध्यमातून ईश्वर भक्ती बरोबर समाज घडविण्याचे महान कार्य केले. आपल्या कीर्तनातून त्यांनी त्याकाळी वाढलेल्या अंधश्रद्धेला कमी करण्यासाठी प्रयत्न केले. या कामी संत वचनांचा व उदाहरणांचा वापर त्यांनी आपल्या कीर्तनातून मांडला. जसे संत तुकाराम महाराज अंधश्रद्धेचा विरोध करताना म्हणत असत की

'नवसे सायासे पुत्र होती ।
तरी का करणे लागे पती ।।

किंवा

'शेंदरी हेंदरी दैवते ।
कोण पूजी भुते खेते ।।
आपल्या पोटासी रडती ।।

किंवा मुक्ताबाई म्हणाल्या

'वरी भगवा झाला नामे ।
अंतरी वश केला कामे ।
त्याला म्हणू नये साधू ।
जगी विटंबना बाधु ।।

यासारख्या संत साहित्यातील अनेक उदाहरणांद्वारे महाराजांनी अंधश्रद्धेला कडाडून विरोध केला. एवढेच नाही तर आधुनिक विज्ञान युगाचे त्यांनी वेळोवेळी स्वागत केले.त्यांना हृदयविकाराचा झटका आला तेंव्हा त्यांनी केवळ नामस्मरण करत बसले नाहीत तर डॉक्टरांचा सल्ला घेऊन आपल्यावर उपचार करून घेतले. म्हणजेच विज्ञान आणि अध्यात्म यांचा संगम करण्याचा प्रयत्न त्यांनी केलेला दिसून येतो. प्रत्येकांनी रंजल्या गांजल्याची सेवा केली पाहिजे असे ते नेहमी आपल्या कीर्तनातून, प्रवचनातून व एरव्ही बोलतानाही व्यक्त करत असत. ते केवळ असे बोलतच नव्हते तर तशी कृतीही ते करायचे. संत तुकाराम महाराजांचा

जे का रंजले गांजले ।
त्यासी म्हणे जो आपुले ।
तोचि साधु ओळखावा ।